Police Inspector * Shikrapur Police Station *

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): पुणे ग्रामीण **P.S.**(ठाणे): शिक्रापूर **Year** (वर्ष): 2021
   **FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0412 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 09/06/2021 22:40 बजे
2. **S.No.** (अ.क्र.) **Acts** (अधिनियम) **Sections** (कलम)

| S.No. | Acts | Sections |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):
   1. **Day**(दिवस): दरमियानी दिन **Date From** (दिनांक पासून): 09/01/2021
      **Time Period** (कालावधी): **Date To** ( दिनांक पर्यंत): 08/02/2021
      **Time From** (वेळेपासून): 00:00 बजे
      **Time To** (वेळेपर्यंत): 00:00 बजे

   (b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
   **Date** (दिनांक ): 09/06/2021 **Time** (वेळ): 21:25 बजे

   (c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ
   **Entry No.** (नोंद क्र.): 034 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 09/06/2021 21:45 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
   1. (a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 1 किमी
      **Beat No.** (बिट क्र.):

      (b) **Address** (पत्ता): शिक्रापुर

      (c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
      **Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
      **District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):
   (a) **Name** (नाव): विलास शंकर धुमाळ
   (b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
   (c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1985 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
   (e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
   (f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):
   **Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | चिंचोली मोराची ,शिरुर ,शिक्रापुर ,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | चिंचोली मोराची ,शिरुर ,शिक्रापुर ,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.):

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. जाधवरा तलाठी शिक्रापुर | | | 1. शिक्रापुर ,शिरुर ,शिक्रापुर ,पुणे ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री पंडीत कर्मचारी रा शिक्रा | | | 1. शिक्रापुर ,शिरुर ,शिक्रापुर ,पुणे ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

श्री. विलास शंकर धुमाळ, वय-36वर्षे, धंदा-नोकरी, रा.चिंचोली मोराची, ता.शिरुर जि.पुणे, मो.नं. 9096809326.ी वरील प्रमाणे असुन मी दि.04/01/2021 रोजी अँटी करप्शन ब्युरो, पुणे कार्यालयात पोलीस निरीक्षक श्रीमती अलका सरग मडम यांचेकडे तक्रार दिली. त्यावरुन त्यानी दोन पंच व सापळा पथक यांनी बोलावुन त्याचेशी ओळख करुन दिली. मी पंचासमक्ष माझी लाच मागणी संदर्भाने तक्रार दिली ती खालील प्रमाणे.मी वरील प्रमाणे असुन वर नमुद ठिकाणी मी माझ्या कुटुंबियांसह रहावयास आहे. मी पुणे महानगर पालिका परिवहन महामंडळ येथे चालक म्हणुन कर्तव्यास असुन त्याद्वारे कुटंुबाचा उदरनिर्वाह करतो. मी माझ्या बायकोच्या नावे सन 2016 मध्ये शिक्रापुर येथे एक गुंठा जमीन खरेदी केलेली आहे त्यामध्ये श्री.दत्तात्रय भाऊसाहेब धुुमाळ व माझी पत्नी शुभांगी विलास धुमाळ यांच्या मध्ये एक गंुठा जागा खरेदी केलेली आहे. मी खरेदी केलेल्या वरील जागेची नोंद सात बारा संदरी घेण्यासाठी शिक्रापुर तलाठी कार्यालयात अर्ज करुन तलाठी कार्यालयातील जाधव भाऊसाहेब यांना वेळोवेळी भेटलो असता त्यांनी माझ्या वर नमुद जागेची नोंद सात बारा सदरी घेण्यासाठी पहिल्यांदा 30,000/- रु.मागितले. मी त्यांना आपल्याला एवढी रक्कम देण्याची माझी परिस्थिती नाही असे म्हणालो असता यावर ते मला ठिक हे 25,000/- रु.दे त्या शिवाय तुझ्या नोंदीच काम होणार नाही असे म्हणाले. यावर माझी खात्री झाली की, मी जाधव तलाठी भाऊसाहेब यांना त्यांनी मागितलेली 25,000/- रक्कम दिली नाही तर ते माझे काम करणार नाही. मला जाधव भाऊसाहेबांना 25,000/- रु.लाच रक्कम देण्याची इच्छा नाही. जाधव भाऊसाहेब यांच्याशी माझे यापुर्वीचे कोणतेही आर्थिक व्यवहार नाहीत. तरी शिक्रापुर तलाठी कार्यालयाचे भाऊसाहेब श्री.जाधव यांच्यावर आपल्या विभागामार्फत योग्य ती कार्यवाही व्हावी हि विनंती.. सदर कारवाईत पंच क्र.1 म्हणून श्री.अतुल नानासाहेब बारंगुळे व पंच क्र.2 श्री. नारायण उत्तम जाधव हे करतील असे सरग मडम यांनी ठरवले. त्यांनतर माझे व पंच श्री.बारंगुळे यांचे निवेदन घेतले. त्यांनतर मी जाधव भाऊ साहेब यांना फोन करुन ते कार्यालयात आहेत अगर कसे याबाबत विचारणा केली असता त्यांनी मला तलाठी कार्यालयात भेटण्यासाठी बोलविले. सदर दोन्ही संभाषण व्हाईस रेकर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले. त्यांनतर पंच क्र. 1 बारंगुळे यांचे सोबत तलाठी कार्यालय शिक्रापुर येथे जाधव भाऊ साहेब यांची भेट घेण्याकारीता व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझे सोबत देवून पाठविले. सदर ठिकाणी माझी जाधव भाऊसाहेबांशी समक्ष भेट झाली. भेटीदरम्यान जाधव भाऊसाहेब मला म्हणाले की मी काय म्हणतो, दोघांत सांगितल होत ना तुम्हाला असे म्हणाले यावर मी त्यांना काही तरी कमी करा असे म्हणालो असता जाधव भाऊसाहेब मला एवढंच सांगितलय असे म्हणुन प्रथम हाताच्या इशा-याने 25 केले असता मी त्यांना ते हातवारे कुठन काय करताय असे म्हणालो असता जाधव भाऊसाहेब मला पंचवीस सांगतोय असे म्हणाले. त्यांनतर मी जाधव भाऊसाहेबांना अध्र्या तासात येतो असे म्हणालो असता जाधव भाऊसाहेब मला नंतरच काय सांगता येत नाही, बरं या तुम्ही या बघु असे

म्हणुन लोकसेवक श्री.जाधव, तलाठी, शिक्रापुर तलाठी कार्यालय यांनी माझ्याकडे मी खरेदी केलेल्या जमिनीच्या दस्ताची सातबारा सदरी नोंद घेण्यासाठी 25,000/- लाच रक्कम मागणी केली असल्याचे दिसुन आले.सदरवेळी मी माझेकडील सापळा कारवाईसाठी रक्कम म्हणुन देण्यासाठी असलेले 25,000/- रु हजर केले. सदर तिकाणी मला व पंचाना अन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म, त्यांची कार्यपद्धती व त्यांचे प्रात्यक्षिक करुन दाखविले व त्याबाबत सविस्तर माहिती दिली. लाच रक्कम लोकसेवक यांनी स्विकारल्यानंतर पुर्व नियोजित इशारा करण्याच्या सुचना दिल्या. त्यांनतर मला व पंचाना व्हईस रेकर्डरसह तलाठी कार्यालयात रवाना केले. तत्पुर्वी ठरल्या प्रमाणे सदर ठिकाणी सापळा पथक तलाठी कार्यालयाचे आजुबाजुस थं◌ांबुन राहिले. त्यानंतर शिक्रापुर तलाठी कार्यालय येथील सापळा कारवाईदरम्यान तलाठी कार्यालयातील इसमाने जाधव भाऊसाहेब बाहेर असलेबाबत मला कळविलेने मी जाधव भाऊसाहेब यांना फोन करुन संपर्क केला असता जाधव भाऊसाहेबांनी मला ते कामानिमीत्त बाहेर असल्याचे सांगुन ऑफीसमधील मुलास भेटण्यास सांगितले त्यावर मी जाधव भाऊसाहेब यांना कार्यालय बंद असल्याचे कळविल्यानंतर लोकसेवक यांनी मला गुरुवार दि.07/01/2021 रोजी भेटण्यासाठी येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. दि.07/01/2021 रोजीचे सापळा कारवाईकरिता माझे व पंचांचे सापळा निवेदन घेऊन शिक्रापुर तलाठी कार्यालय येथे सापळा कारवाईचे नियोजन केले. मला पंच श्री.बारगुळे यांचेसह व्हईस रेकर्डर लावुन रवाना केले. सापळा कारवाई दरम्यान तलाठी कार्यालयात जाधव तलाठी हे मिळुन न आलेने मी जाधव तलाठी यांना फोन केला असता जाधव तलाठी यांनी मला कार्यालयातील मुलास भेटण्यास सांगितले. त्यानंतर कार्यालयातील मुलगा पंडीत यांचेशी माझे समक्ष संभाषण झाले. संभाषणादरम्यान तलाठी कार्यालयातील कर्मचारी पंडीत मला सांगितल तसं करुन जावा म्हणल, काय द्यायचं ते देऊन जावा असे मला म्हणाले असता मी त्याना हा ठिक हे, पण फोन लावुन तुमचा देतो ना भाऊसाहेबांना, आता तुमीच का दुसरे येत मला कळायला पाहिजे ना व तलाठी सायबानी सांगितलेले इसम तुम्हीच आहेत का असे म्हणुन त्याची खात्री करण्यासाठी मी कर्मचारी पंडीत यांचेशी तलाठी सायबांना फोन करण्यासंदर्भात चर्चा केली. त्यानंतर तलाठी कार्यालयातील कर्मचारी हे काही काळासाठी बाहेर गेले व त्यानंतर परत कार्यालयात आल्यानंतर मी त्यांना फोन केल्याप्रमाणे आणलंय असे म्हणालो असता पंडीत मला नाय नाय काय विषय नाय, जावु द्या, मी सरांना बोलतो आलता तुम्ही, नोटीस काढली ना, मग तुम्हाला फोन करतो सहयासाठी असे म्हणुन माझ्याकडुन लाच रकमेचा स्विकार केला नाही. त्यानंतर मी व पंच असे परत इंडियन ऑईल पेट्रोलपंप, सणसवाडी, पुणे नगर रोड येथे आलो असता सरग मडम यांनी मला व पंचांना घडलेल्या घटनेची हकीकत विचारली त्यानुसार मी श्रीमती सरग मडम यं◌ाना घडलेली हकिकत सांगीतली. त्या ठिकाणी काय घडले याबाबत सरग मडम यांनी पंच क्र.1 यांच्याकडुन हकिकत समजाऊन घेतली व व्हाईस रेकर्डरवर ही ए◌ैकली. त्यावरुन सदरवेळी पोलीस निरीक्षक सरग मडम यांनी मला माझ्या संशयास्पद बोलण्याने व वागण्याने लाच रकमेचा स्विकार झाला नसल्याचे सांगितले. त्यानंतर मी सरग मडम यांना पंचासमक्ष सांगितले की, नोटीस काढल्यानंतर ती मला देतेवेळी जाधव भाऊसाहेब अगर पंडीत यांचेकडुन लाच रकमेचा स्विकार होऊ शकतो असे कळविले त्यानुसार सदरची कारवाई नोटीसच्या कामावेळी करण्याचे सर्वानुमते ठरले. सदरबाबत सविस्तर पंचनामा माझे व पंचांचे उपस्थितीत अँटी करप्शन ब्युरो, पुणे कार्यालयात करण्यात आला आहे.त्यानंतर मी दि.20/01/2021 रोजी सरग मडम यांना फोन करुन कळविले की, पंडीत यांनी नोटीस बाबत फोन करुन दि.21/01/2021 रोजी ऑफीसला बोलविले आहे. सदर कारवाईसाठी मी सरग मडम यांना सापळा पथकासह हटेल चंद्रमा, शिक्रापुर चाकण रोड येथे येण्यास सांगितले.दि.21/01/2021 रोजी हटेल चंद्रमा, शिक्रापुर चाकण रोड येथे हजर असताना तेथे माझे व पंचांचे सापळा निवेदन घेऊन शिक्रापुर तलाठी कार्यालय येथे सापळा कारवाईचे नियोजन केले. त्यानंतर मला व पंचाना व्हईस रेकर्डरसह तलाठी कार्यालयात रवाना केले. तत्पुर्वी ठरल्या प्रमाणे सदर ठिकाणी आमचेपुर्वी सापळा पथक तलाठी कार्यालयाचे आजुबाजुस थं◌ांबुन राहिले. शिक्रापुर तलाठी कार्यालय येथील सापळा कारवाई दरम्यान तलाठी कार्यालयात जाधव भाऊसाहेब व माझी समक्ष भेट झाली. सदरवेळी लोकसेवक जाधव व त्यांचेकडील कर्मचारी पंडीत यांनी माझ्याकडे लाच रकमेबाबत बोलणे केले नाही तसेच कोणत्याही प्रकारे लाच रकमेचा उल्लेख केलेला नाही. सदरवेळी मला नोटीस देऊन त्याची पुर्तता करुन घेऊन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. सदरवेळी मी सरग मडम यांना पंचासमक्ष मी या नोटीसची पुर्तता करुन झाल्यावर त्यांना भेटणार आहे त्यावेळी आपण परत सापळा कारवाईचे नियोजन केल्यास ते माझ्याकडुन लाच रक्कम स्विकारण्याची शक्यता आहे असे कळविले. त्यानुसार सर्वानुमते सदरची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्याचे सर्वानुमते ठरले. सदरबाबत सविस्तर पंचनामा माझे व पंचांचे उपस्थितीत अँटी करप्शन ब्युरो, पुणे कार्यालयात करण्यात आला आहे.मी दि. 07/02/2021 रोजी सरग मडम यांना फोन करुन कळविले की, नोटीसच्या कार्यवाहीची पुर्तता करण्यात आली असुन मी दि.08/02/2021 रोजी लोकसेवक जाधव व पंडीत यांना तलाठी कार्यालयात भेटण्यास जाणार आहे. तसेच सदरवेळी दोघे कार्यालयात हजर असणार आहेत असे कळविले. सदर कारवाईसाठी मी त्यांना सापळा पथकासह हटेल चंद्रमा, शिक्रापुर चाकण रोड येथे येण्यास सांगितले. दि.08/02/2021 रोजी सापळा कारवाई करण्यात आली सदर कारवाई दरम्यान तलाठी जाधव व खाजगी इसम पंडीत यांना सदर सापळा कारवाईचा संशय आल्याने त्यानी लाच मागणी केलेली रक्कम स्विकारली नाही.यापुढे ही ते माझ्याकडून कोणत्याही प्रकारची लाच रक्कम स्विकारणार नाहीत. अशी माझी खात्री झाली त्यावरुन सापळा कारवाई स्थगित करण्यात आली. एकंदरीत दि.04/01/2021 रोजीच्या माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने पंचासमक्ष दि.04/01/2021,दि.07/01/2021 दि.21/01/2021दि.08/02/2021 रोजी करण्यात आलेली लाचेची पडताळणी,सापळापुर्व व सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटना तसेच प्रत्यक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण यावरुन श्री.दत्तात्रय भाऊसाहेब धु◌ुमाळ व माझी पत्नी शुभांगी विलास धुमाळ यांच्या मध्ये एक गं◌ुठा जागा खरेदी केलेली आहे.सदर खरेदी केलेल्या जागेची नोंद सात बारा सदरी घेण्यासाठी शिक्रापुर तलाठी कार्यालयातील तलाठी श्री जाधव यांनी माझेकडे 25,000/- रुपये लाच मागणी करुन ती लाच रक्कम खाजगी इसम श्री पंडित यांचेकडे देण्यास सांगितली,त्यास खाजगी इसम श्री पंडीत यांनी सहाय्य करुन लाच रक्कम माझेकडे मागितली असल्याचे निष्पन्न झाले.शिक्रापुर तलाठी श्री जाधव व खाजगी इसम श्री पंडित यांनी शिक्रापुर तलाठी कार्यालय,ता. शिरुर,जि.पुणे येथे गुन्हेगारी स्वरूपाचे कृत्य केले आहे.म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

Police Inspector * Shikrapur Police Station *

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

13. Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): hemant ganpat shedge
**Rank** (पद): I (Inspector)
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Dhumal S

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
शिक्रापूर पोलीस स्टेशन
पुणे ग्रामीण

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Umesh Audumber Tawaskar
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

सदरची मुळ प्रत
मिळाली
Dhumal S